# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:20.08.2024** **वार:मंगळवार**

---

**ठळक बातम्या**

- कोलकाता इथल्या महिला डॉक्टर च्या बलात्कार आणि हत्ये प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात आज सुनावणी.
- देशभरात रक्षाबंधन आणि नारळी पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरा.
- राज्यात विविध दुर्घटनांमधे 9 जणांचा मृत्यू.

  आणि
- राज्यात विविध ठिकाणी पावसाची पुन्हा जोरदार हजेरी.

**कोलकाता**

कोलकात्यातल्या महिला डॉक्टरवरच्या बलात्कार आणि हत्या प्रकरणाची दखल सर्वोच्च न्यायालयानं घेतली असून आज त्यावर सुनावणी होणार आहे. सर न्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय पीठासमोर सुनावणी होणार असून, न्यायमूर्ती जे बी पारडी वाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा हे या पीठाचे सदस्य आहेत. कोलकात्यातल्या महिला डॉक्टर बलात्कार आणि हत्या प्रकरणी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वतः लक्ष घालावं, अशी विनंती करणारं पत्र देशातल्या 70 हून अधिक पद्म पुरस्कार प्राप्त डॉक्टरांनी लिहलं आहे. अशा हिंसक कृती वैद्यकीय व्यवसायाचा पाया हादरवणाऱ्या असून महिला आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या विरोधात होणाऱ्या हिंसाचाराकडे तातडीनं लक्ष पुरवण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे.
दरम्यान सर्व केंद्र सरकारी रुग्णालयांमध्ये सुरक्षितता व्यवस्थेत 25 टक्क्यांनी वाढ करण्यास केंद्र सरकारनं मान्यता दिली आहे.

**फडणवीस**

मराठा समाजासाठी आजपर्यंत जे काही निर्णय झाले ते एक तर मी केले, किंवा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेले आहेत. मुख्यमंत्री शिंदे यांच्या पाठीशी मी ठामपणे उभा राहिलो आहे, त्यांना पाठबळ दिलं आहे. मात्र, मनोज जरांगे पाटील हे जाणीवपूर्वक कथानक तयार करत असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मुंबईत काल माध्यमांशी बोलताना त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. दरम्यान , देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री होते तेंव्हा मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यामुळे देवेंद्र फडणवीस हे मराठा समाजाचा विरोध करतात, हा आरोप पुर्णपणे चुकीचा  आहे त्यात कोणतेही तथ्य नाही. आम्ही सर्वजण एकत्रितपणे निर्णय घेतो असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केलं आहे.

**दौंड - बैठक**

पुणे जिल्ह्याच्या दौंड तालुक्यातील उजनी धरणाच्या जल क्षेत्रात बुडीत बंधारे बांधण्यासाठी सुधारित धोरण ठरविण्याबाबत समिती स्थापन करुन तिच्या अहवालानंतर धोरण निश्चित करण्याचा निर्णय काल मुंबई झालेल्या एका बैठकीत घेण्यात आला. दौंड इथल्या विविध विकासात्मक कामा संदर्भात आमदार राहुल कुल यांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगानं  ही बैठक घेण्यात आली.

**रक्षाबंधन**

देशभरात काल भावा-बहिणीच्या पवित्र नात्याचा सण रक्षाबंधन आणि नारळी पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विधानपरिषदेच्या आमदार भावना गवळी यांनी दिल्ली इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना राखी बांधली. मुख्यमंत्र्यांच्या वर्षा या शासकीय निवास स्थानी रक्षाबंधनाचा सण साजरा करण्यात आला. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी राज्यभरातून 1 कोटी 40 लाख अर्ज आले. त्यातील पात्र झालेल्या १ कोटी ४ लाख लाभार्थ्यांच्या खात्यात योजनेचे पहिल्या दोन हप्त्यांचा निधी जमा करण्यात आल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितलं. सांगली इथं महापालिका आयुक्त शुभम गुप्ता यांनी सुंदर नगर मध्ये येऊन वारांगना बहीणींसोबत तसच आस्था महिला निवारा केंद्रात रक्षाबंधन साजरा केला. नंदुरबार इथल्या आदिवासी आश्रम शाळेच्या विद्यार्थिनी नी टाकाऊ वस्तूंपासून राख्या बनवून पोस्ट द्वारे आसाम आणि राजस्थान सीमेवर तैनात असलेल्या  सैनिकांपर्यंत पोहोचल्या आहेत. आम्ही पुणेकर संस्था आणि श्री पांडुरंग आदर्श सेवा ट्रस्ट  यांच्या वतीनं  कुपवाडा जिल्ह्यातील केरन सेक्टर इथं सीमेवरील जवानांना  राखी बांधून रक्षाबंधन साजरा करण्यात आला.
मुंबई आणि नवी मुंबईतल्या विविध कोळी वाड्यांमध्ये नारळी पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कोळी पुरुष आणि महिलांनी पारंपरिक वेषभूषेत नृत्ये सादर  करत नारळाच्या पालख्या काढल्या. यावेळी ग्रामस्थांनी समुद्राला शांत करण्यासाठी सोन्याचा प्रतिकात्मक नारळ अर्पण केला. यानिमित्ताने बोटींना रंगरंगोटी करून पताका लावण्यात आल्या होत्या. सिंधुदुर्ग किल्ल्यावरून मानाचा नारळ सागराला अर्पण करण्यात आला. मालवण मध्ये नारळ लढवणे स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पालघर जिल्ह्यातल्या केळवे समुद्र किनारी कोळी बांधवांकडून भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं.

**पुरस्कार**

सहकार चळवळीचे जनक डॉक्टर विठ्ठल राव विखे पाटील यांच्या स्मरणार्थ दिल्या राज्यस्तरीय साहित्य आणि कला गौरव पुरस्काराचं वितरण काल अहमदनगरमधे करण्यात आलं. जेष्ठ साहित्यिक आणि विचारवंत प्रेमा नंद गज्वी यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. कानपूर इथले समीर चव्हाण यांच्या ‘अखई ते जाले या ग्रंथाला उत्कृष्ट साहित्यय कृतीचा पुरस्कार मिळाला. हसन शेख पाटेवाडीकर यांना कलेच्या सेवेबद्दल पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील कला गौरव पुरस्कार, तर नाटककार अभिनेता प्राजक्त देशमुख यांना नाट्य सेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष रविंद्र शोभणे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते तर केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रताप राव जाधव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**बोली**

बोली एक संस्कृती उभी करत असते, एखादी बोली लुप्त झाली तर ज्ञानाचं मोठं संचित नष्ट होतं असं मत समीक्षक तथा भाषा अभ्यासक प्राचार्य डॉ. महेंद्र कदम यांनी व्यक्त केलं आहे. ते काल हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील कुरुंदा इथं 'मराठवाडी बोली बोलू कौतुके' या मेळाव्यात बोलत होते. आपण एक संपूर्ण संस्कृती नव्यानं स्थापित करत आहोत या भूमिकेतून शब्द संकलनापासून संशोधनापर्यंत प्रत्येक टप्प्यावर बोलीभाषा प्रेमींना कार्य करावं लागेल अशी अपेक्षाही यांनी व्यक्त केली.

**बुडून मृत्यू**

जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यातील पिंपरखेड गावात अल्पवयीन चार सख्ख्या भावंडांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. मोठी बहीण भांडी घासण्यासाठी धरणाच्या काठावर गेली होती तिचा पाय घसरून ती पाण्यात पडली. तिला वाचवण्याच्या प्रयत्नात उर्वरित तिन्ही भावंडेही पाण्यात पडली असं हिंदुस्तान समाचार या वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

**नौका मृत्यू**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवण तालुक्यातल्या सर्जे कोट इथून मासेमारीला गेलेली लहान नौका आचरा हिर्लेवाडी इथल्या समुद्रात दाट धुक्यामुळे परवी मध्यरात्री दुर्घटना ग्रस्त झाली. यामध्ये तीन मासे मारांचा मृत्यू झाला तर एक खला शानं पोहत किनारा गाठल्याने तो वाचू शकला.

**पाऊस**

सात ते आठ दिवसांच्या विश्रांतीनंतर काल नाशिक शहरात मुसळधार पावसानं हजेरी लावली. यामुळं रस्त्यावर आणि उड्डाणपुलावर पाणी साचलं होतं. पुण्यात आणि सातारा इथं देखील संध्याकाळच्या सुमारास जोरदार पाऊस झाला. रत्नागिरी शहर आणि आजूबाजूच्या परिसरात विजांसह पाऊस पडला. गेला आठवडाभर पाऊस विश्रांत होता. जालना शहर परिसरात तसंच जिल्ह्यातल्या मंठा, परतूर तालुक्यात जोरदार पाऊस झाला. या मुळं काही भागातल्या नदी-नाल्यांना पूर आला होता. या पावसामुळ खरीपातल्या पिकांना जीवन दान मिळालं आहे. हिंगोली जिल्ह्यातील सेन गाव तालुक्यातील साखरा शिवारात काल वीज कोसळून एका शेतकरी महिलेचा मृत्यू झाला तर तिचे पती गंभीर जखमी झाले. बुलडाणा इथंही काल जोरदार पाऊस झाला. जिल्ह्यातील मल कापूर तालुक्यात म्हैसवाडी इथं एका मजूर महिलेचा वीज अंगावर पडून मृत्यू झाला.

**हवामान**

राज्यात आज कोकण, मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार तर मराठवाडा आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रवरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं , नमस्कार.**